RNI No. MAHBIL/2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग दोन

वर्ष ८, अंक १८] मंगळवार, मार्च १५, २०२२/फाल्गुन २४, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १२.००

## असाधारण क्रमांक ३५

## प्राधिकृत प्रकाशन

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

**शहर विकास विभाग**

**जाहीर सूचना**

**(महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये)**

क्रमांक ठामपा/मुख्या. १/शविवि-२९/वियोअंक/२७६९

ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारीत विकास योजना शासन निर्णय क्रमांक टिपीएस/१२९७/१३१९/सी आर-१४८/९७/नवि-१२, दिनांक ४ ऑक्टोबर १९९९ अन्वये मंजूर असून, २२ नोव्हेंबर १९९९ पासून अंमलात आली. तसेच सुधारीत विकास योजनेतील वगळलेल्या क्षेत्राची (Excluded portion) विकास योजना शासन निर्णय क्रमांक टिपीएस/१२०१/२७४/सीआर-२८/२००९/नवि-१२, दिनांक ३ एप्रिल २००३ अन्वये मंजूर झाली असून दिनांक १४ मे २००३ पासून अंमलात आली आहे (यापुढे " उक्त मंजूर विकास योजना " असे संबोधिले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, खाडी किनारपट्टीचे संवर्धन व जैवविविधता संरक्षित करण्याच्या दृष्टीने पारसीक रेतीबंदर, साकेत - बाळकुम, कळवा शास्त्रीनगर व कोपरी या ठिकाणी खाडीलगत वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट प्रकल्पाची संकल्पना आहे. सदर क्षेत्र विकसित झाल्यास CRZ-I क्षेत्रातील कांदळवन क्षेत्राचे संवर्धन व जतन योग्य प्रकारे करता येईल. वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट प्रकल्पामुळे ठाणे शहरात नागरिकांना मनोरंजनात्मक जागा विकसित होऊन पर्यटनास चालना देता येईल. वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट प्रकल्पाकरिता महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांची दिनांक १ मार्च २०१९ रोजी मंजुरी प्राप्त झालेली आहे ;

आणि ज्याअर्थी, मंजूर विकास आराखड्यामधील मौजे चेंदणी, कोपरी येथील खाडीलगत खाली नमूद केल्यानुसार क्षेत्रावर " वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट" असा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे आवश्यक आहे. (यापुढे " उक्त फेरबदल " असे संबोधिले आहे) सदरचा फेरबदल करण्यास मा. महासभा ठराव क्रमांक ४९४, दिनांक २९ डिसेंबर २०२१ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

| गावाचे नाव | स.क्र. | मंजूर विकास आराखड्यातील विभाग | प्रस्तावित फेरबदल | सुमारे क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| मौजे चेंदणी, कोपरी | ११७(पै), ११८(पै), ११२(पै) व खाडीलगत परिसर | अस्तित्त्वातील कस्टम ऑफीस, वॉटर ट्रान्सपोर्ट टर्मिनल, HCMTR | वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट | ०.६२ |

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) मधील तरतूदीनुसार " उक्त मंजुर विकास योजनेत " " उक्त फेरबदलाबाबत " आम जनतेच्या सूचना / हरकती मागविणेसाठी ही जाहिर सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे. उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा सहायक संचालक, नगररचना, ठाणे महानगरपालिका, महापालिका भवन, सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे यांचे कार्यालयीन सूचना फलकावर व खाली नमूद केलेल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. उक्त फेरबदलाबाबत कोणत्याही व्यक्तीस सूचना / हरकती घ्यावयाची असल्यास त्यांनी ही सूचना वृत्तपत्रात व *www.thanecity.gov.in* या संकेतस्थळावर आणि **महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत आपली सूचना / हरकत महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचेकडे अथवा E-mail ID - *adtp@thanecity.gov.in* वर सादर करावी.

संकेत स्थळ :- *www.thanecity.gov.in*

ठाणे,
दिनांक १४ मार्च २०२२.

**स. पं. उगिले,**
सहायक संचालक, नगररचना,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

# THANE MUNICIPAL CORPORATION, THANE

## Town Planning Department

## Notice

## (U/s. 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966)

No. TMC Hq.1/ TDD-29/ DPIC/2769

Whereas, the Revised Development Plan of the city of Thane has been sanctioned by Government *vide* Notification No.TPS/1297/1319/CR-148/97/UD-12, dated 4th October 1999 and came into force from 22nd November 1999. Also the Development Plan for Excluded portion (EP) from Revised Development plan was sanctioned *vide* Government's Notification No. TPS/1201/274/CR-28/2009/UD-12, dated 3rd April, 2003 and came into force from 14th May 2003 (hereinafter referred to as " The said Sanctioned Development Plan ") ;

And whereas, the concept of Water Front Development Project along Parsik Retibandar, Saket - Balkum, Kalwa Shastrinagar and Kopari area is for promotion of creek coast and protection of biodiversity. If this area is developed, it will help to promote and save the mangroves in Coastal Regulation Zone (CRZ-I) area. Also the Water Front Development Project will help to develop recreational ground for citizens of Thane city, which in turn will help to boost tourism. Maharashtra Coastal Zone Management Authority (MCZMA) has accorded sanction to Water Front Development Project on 1st March 2019 ;

And whereas, the reservation for Water Front Development along the creek area of Village Chendani, Kopari is required to be proposed in the Sanctioned Development Plan of Thane city. So it is necessary to propose modification for " Water Front Development Project " as stated below, under section 37(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 in " the said Sanctioned Development Plan" (hereinafter referred to as " The said modification ") Hon. General Body of Thane Municipal Corporation *vide* its Resolution No. 494, dated 29th December 2021 has accorded sanction for the abovesaid procedure of modification.

| Village Name | Survey No's | As per Sanctioned Development Plan | Proposed Modification | Area in Hectares (Ha.) |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| Chendani Kopari | 117(pt), 118 (pt), 112(pt) and area adjoining the creek | Existing Custom office, Water Transport Terminal, HCMTR | Water Front Development | 0.62 |

And therefore, this notice is published for inviting suggestions/objections from the public to carry out " The said Modification in The said Sanctioned Development Plan " as per the provisions under section 37(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. The Plan showing "The said modification" is displayed on the notice board in the office of Assistant Director Town Planning, Town Development Department, Thane Municipal Corporation, "Mahapalika Bhavan", Sarsenani General Arunkumar Vaidya Marg, Chandanvadi, Panchpakhadi, Thane and also published on web site mentioned below. Any person who wants to submit suggestion may submit his suggestion or objection to the said modification within 30 (Thirty) days from the publication of this notice in the news paper, on the website *www.thanecity.gov.in* and *Maharashtra Government Gazette,* to the Municipal Commissioner, Thane Municipal Corporation, Thane or on the E-mail ID - *adtp@thanecity.gov.in*

**Web Site -** *www.thanecity.gov.in*

S. P. UGILE,
Asst. Director Town Planning,
Thane Municipal Corporation, Thane.

Thane,
Dated the 14th March 2022.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHEDAT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD,MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.